**Electronic Interdisciplinary International Research Journal (EIIRJ)**
A Peer Reviewed Interdisciplinary Journal UGC Approved Journal No 48833
Impact Factor 5.20 ISSN 2277-8721

# विविध पदव्युत्तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा अभ्यास.

**प्रा. गजानन मुरलीधर खेकाडे (सहाय्यक प्राध्यापक)**

*आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर जि. धुळे*

***सारांश***

*प्रस्तुत संशोधन पेपरांमध्ये विविध पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा अभ्यास केला आहे. वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला होता. सहेतूक नमुना निवड पद्धतीव्दारे ९० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. संशोधन अभिवृत्ती विषयक माहिती संकलन करण्यासाठी डॉ. विशाल सूद आणि प्रा. वाय. के. शर्मा यांची प्रमाणित मापिकेचा अवलंब केला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर केला होता. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष- कला व विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्ती फरक दिसून येत नाही.*

**प्रमुख संज्ञा:** कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी, संशोधन अभिवृत्ती.

**प्रस्तावना**

मानवी जीवनाच्या कल्याणासाठी व्यवहारातील, जीवनातील, सृष्टीतील विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने संशोधन करणे गरजेचे असते. संशोधनात मानवी जीवनांशी अनेक जुळलेल्या घटना, समस्या, प्रसंग वा कारणे अशा विविध गोष्टी सोडविण्याची क्रिया होत असते. तसेच संशोधन हे मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, वैज्ञानिक, व्यवहारीक, तात्विक व मानसशास्त्रीय समस्यांचा उलगडा करत असते, अशा विविधांगी गोष्टींचा विचार केला जात असल्यामुळे गुणवत्तापूर्ण ज्ञान म्हणजे जे ज्ञान योग्य संशोधनाचा वापर करुन मिळवले जाते त्यासाठी योग्य संशोधनातून त्याचे विश्लेषण करणे महत्त्वाचे असते. सामाजिक आणि राष्ट्रीय विकासासाठी दृष्टिकोनातून गुणवत्तापूर्ण संशोधन व संशोधन वृत्तीस वाव देणे आवश्यक आहे. व्यासंगाच्या अभावी कोणताही विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकणार नाही. आपल्या करिअरचे सखोल व सर्वांगिण ज्ञान प्राप्त करणे. व निरंतर अध्ययनशील वृत्ती कायम ठेवून त्या ज्ञानात सतत अद्ययावतपणा आणत जाणे. केवळ ज्ञान नवे तर त्यातील नवनवे विचार, प्रवाह, प्रयोग संशोधन याचा परिचय करुन घेऊन आपले करिअर समृध्द व संपन्न करण्याचा योग्य प्रयत्न करायला हवा. दूर्देवाने विद्यार्थ्यांमध्ये ही व्यासंग वृत्ती व ज्ञान लालसा फारशी आढळून येत नाही. कारण अध्ययनशिलता व व्यासंगातूनच चिंतनशील मनोवृत्तीमधुनच जीवनाकडे पाहण्याचा तात्वीक दृष्टीकोन निर्माण होतो. अशी ज्ञाननिष्ठा ज्या विद्यार्थ्यांमध्ये असेल ते उत्कृष्ट संशोधक होवू शकतात.

भारतीय शिक्षण पद्धतीत संशोधनाशी संबंध हा पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना बऱ्याच प्रमाणात येत असतो. त्यानंतर एम.फील आणि पीएच.डी. स्तरावरच संशोधनाचा अनुभव घेता येतो. परंतु त्या स्तरावरील संशोधनाचा अनुभव काही वेळेस विद्यार्थ्यांना घ्यावयाच्या असल्याने विद्यार्थ्यांना ते गुणवत्तापूर्णरीत्या घेणे महत्त्वाचे असते. त्यांचे संशोधन हे समाजाला राष्ट्रला आणि व्यक्तिला स्वत:ला होत असतो.म्हणूनच प्रस्तुत संशोधनात विविध पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**समस्या विधान**

नंदुरबार शहरातील विविध पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्ट**

१. नंदुरबार शहरातील विविध पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.


२. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. पदव्युत्तर महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**पद्धती-**

प्रस्तुत संशोधनात पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीचा सद्यस्थितीची माहिती जाणुन घ्यावयाची असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. जनसंख्या व न्यादर्श- प्रस्तुत संशोधनातील नंदुरबार शहरातील पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थी हे संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केली होती. सहेतूक नमुना निवड पद्धतीने कला शाखेतील ३०, विज्ञान शाखेतील ३० व वाणिज्य शाखेतील ३० असे एकूण ९० विद्यार्थ्यांची निवड केली होती. **संशोधन साधने-** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पदव्युत्तर महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची संशोधन अभिवृत्ती मापन करण्यासाठी डॉ. विशालसुद आणि प्रा. वाय. के. शर्मा यांची प्रमाणित मापिकेचा अवलंब केला आहे. प्रस्तुत चाचणीत एकूण ४२ प्रश्न दिले आहेत. प्रत्येक प्रश्नाला ०५ पर्याय दिले आहेत. प्रस्तुत चाचणीत विश्वसनीयता ही Split-Half Method ने ०.७३९ ऐवढी निश्चित करण्यात आली आहे. **संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या

संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन- यासाठी डॉ. विशालसुद आणि प्रा. वाय. के. शर्मा यांची प्रमाणित मापिका पदव्युत्तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आली व त्यांनी नोंदवून दिलेला प्रतिसादाचे विश्लेषण खालील प्रमाणे परिकल्पना परिक्षण केले आहे.




**१. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ३० | १६४.९० | २७.५४ | २.०० | ०.१८ | स्वीकार |
| विज्ञान | ३० | १६६.२९ | २९.४० | | | |

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ०.१८ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची संशोधन अभिवृत्तीत फरक नाही.

**२. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ३० | १६४.९० | २७.५४ | २.०० | ०.११ | स्वीकार |
| वाणिज्य | ३० | १६५.७२ | २९.७४ | | | |

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ०.११ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची संशोधन अभिवृत्तीत फरक नाही.

**३. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान | ३० | १६६.२९ | २९.४० | २.०० | ०.०७ | स्वीकार |
| वाणिज्य | ३० | १६५.७२ | २९.७४ | | | |

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ०.०७ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे दिसून येते की, पदव्युत्तर महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची संशोधन अभिवृत्तीत फरक नाही.

**निष्कर्ष**

१. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

२. पदव्युत्तर महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. पदव्युत्तर महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा संशोधन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही

***चर्चा***

प्रस्तुत संशोधनात पदव्युत्तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. वरील निष्कर्ष पाहता कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या संशोधन अभिवृत्तीत फरक नाही. म्हणजे या स्तरावर संशोधनाचे ज्ञान चांगले आहे संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा कल आहे. महाविद्यालयात संशोधन कार्यात वाढ व्हावी यासाठी शासनाने विद्यापीठस्तरीय उपाययोजना कराव्यात. विद्यार्थ्यांना संशोधन कार्यशाळा व सेमिनार साठी महाविद्यालयातून योग्य मार्गदर्शन सहकार्य मिळावे. प्रत्येक महाविद्यालय आणि विदयापीठांनी शोधगंगा तसेच शोधगंगोत्री अशा वेबसाईटशी

इंटरनेट व्दारे जोडुन घ्यावे ज्यातून विद्यार्थ्यांना संशोधकार्यासाठी त्याची मदत होईल. प्रत्येक महाविद्यालयातून संशोधन कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून द्यावेत. या स्तरावरील विद्यार्थ्यांना शोध पेपर तयार करण्यासाठी प्रोत्साहन दयावे.

**संदर्भसूची**

Garrett, H. E (1985) Statistics in Psychology and Education, Bombay Vakils, Feffer and Simons Ltd.

Mangal, S. K. Essential of Educational Psychological, New Delhi: MacGrow Hill Publication.

Sharma, R.A. (2001). Essentials of Measurement in Education and Psychology, Meerut: Surya Publication.

Kothari, C.R. (1990) Research Methodology, Methods and Techniques, New Delhi: Wiley Eastern Limited.

कदम चा. प. (१९८९). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* पुणे: नुतन प्रकाशन.

भिंतांडे वि.रा. (१९९९). *शैक्षणिक संशोधन पद्धती: (तिसरी आवृत्ती)* पुणे: नुतन प्रकाशन.

जगताप, ह. ना. (२००९). *प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान*. पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे रा.श. आणि उमाठे वि. तु. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे* (द्वितीय आवृत्ती), औरंगाबाद: विद्या प्रकाशन.

पंडीत बन्सी बिहारी (२००५). *शिक्षणातील संशोधन.* पुणे: नित्यनूतन प्रकाशन.